
स्थानिक गुन्हे शाखा
रेकॉर्ड रुम
BLACK
PANTHER

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


-: प्रेस नोट :-  दिनांक :- ०२/०७/२०२६

## " जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; सराईत हद्दपार आरोपी जेरबंद, ३५ हजारांचे गावठी पिस्तूल जप्त "

**मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, तसेच मा. श्री. नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने हद्दपार करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराविरुद्ध यशस्वी कारवाई करत त्याच्याकडून विनापरवाना गावठी पिस्तूल जप्त केले आहे.**

दिनांक ०१ जुलै २०२६ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील हद्दपार सराईत गुन्हेगार विजय वसंत अहिरे उर्फ भोमपाली वय ३२ वर्ष, रा. बौद्ध विहार जवळ, गेंडालाल मिल, जळगाव हा गेंडालाल मिल परिसरातील लोकशेड भागात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने विनापरवाना गावठी पिस्तूल बाळगून फिरत आहे. प्राप्त माहितीची पडताळणी करून पोलीस उपनिरीक्षक सोपान गोरे व त्यांच्या पथकाने शिवाजी नगर परिसरातील गेंडालाल मिलजवळील लोकशेड येथे सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता **त्याच्याकडून एकूण ३५०००/- रु किंमतीचे सिल्वर रंगाचे गावठी बनावटीचे लोखंडी पिस्तूल (मॅगझीनसह) जप्त करण्यात आले. सदर प्रकरणी जळगाव शहर पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्र. १९९/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ०३/२५ सह मु. पो. अधि.कलम १४२, ३७(१) (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.**

**आरोपी विजय अहिरे उर्फ भोमपाली याच्याविरुद्ध यापूर्वी जळगाव शहर व एमआयडीसी पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, दरोड्याचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा, मारहाण, दंगल, शस्त्र कायदा यासारखे गंभीर स्वरूपाचे एकूण ०८ गुन्हे दाखल आहेत.**

१) जळगाव शहर पो.स्टे. गुन्हे १८७/२०२३ भादंवि कलम ३२३, ३२४, ३२३, ३२४, ५०४, ५०६, ५२१, ३४ प्रमाणे
२) जळगाव शहर पो.स्टे. गुन्हे. १४/२०२४ भादंवि कलम ३०७, ५०४, ५०६ प्रमाणे
३) जळगाव शहर पो.स्टे. गुन्हे. २८/२०२२ भादंवि कलम ३२३,३२४
४) जळगाव शहर पो.स्टे. गुन्हे. ३८/२०२३ भादंवि कलम ३५३,३३२,२९४,१४७,१४९ प्रमाणे
५) जळगाव शहर पो.स्टे. गुन्हे. ४४४/२०२३ भादंवि कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४६, १४८,१४९, सह आर्म ॲक्ट ३/२५ प्रमाणे
६) जळगाव शहर ३०२१/२०१८ भादंवि क्र १८८,२९०,२९१, सह मु.पो. अधि. क ३६(इ)(अ), १२४, २८ व इतर
७) एमआयडीसी पो.स्टे. गुन्हे. ५०/२०२६ भादंवि कलम १४३,१४७,१४८,१४९,३२४,३२३,३४९,५०४,५०६,४२७
८) जळगाव शहर पो.स्टे. गुन्हे. ८३/२०२३ भादंवि कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६

**सदरची कारवाई कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा. श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, तसेच मा. श्री. नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सोपान गोरे, सहाय्यक फौजदार अतुल वंजारी, पोहकॉ. अकम शेख, विजय पाटील, किशोर पाटील, मुरलीधर धनगर, प्रविण भालेराव, पो.कॉ. छगन तायडे, रविंद्र कापडणे, राहुल रगडे व प्रदीप सपकाळे या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**************************************************************************************************